Maharashtra State Board of
Secondary & Higher
Secondary Education
Kolhapur Divisional Board
Kolhapur-416004

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च
माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ,
कोल्हापूर - ४१६ ००४

Ph No. 0231-2696101/2/3 WebSite : www.sscboardkolhapur.in Email: divsec.kop@gmail.com

क्र.कोविमं/12 वी/परीक्षा/3582
दिनांक : 26/11/2024

प्रति,
प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालय,
सातारा/ सांगली/ कोल्हापूर.

**विषय:- उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12 वी) परीक्षा जुलै-ऑगस्ट 2024 करिता प्रविष्ठ होऊन उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे मूळ प्रमाणपत्रे वितरण करणेबाबत.....**

आपल्या कनिष्ठ महाविद्यालयामार्फत उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इयत्ता 12 वी) परीक्षा जुलै-ऑगस्ट 2024 करिता प्रविष्ठ होऊन उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची मूळ प्रमाणपत्रे दि.27/11/2024 रोजी संबंधित वितरण केंद्रावर हस्तपोहोच देण्यात येत आहेत. तरी, आपल्या कनिष्ठ महाविद्यालय प्रतिनिधीस अधिकारपत्रासह दि.27/11/2024 रोजी उपस्थित राहणेबाबत कळविण्यात यावे.

1. प्रथमत: आपणास प्राप्त झालेले सर्व प्रमाणपत्र आपल्याच कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे आहेत याची खात्री करावी. अन्य कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे प्रमाणपत्र प्राप्त झाले असतील तर ते सिलबंद करुन आपल्या प्रतिनिधीमार्फत त्वरित या कार्यालयाकडे जमा करण्यात याव्यात. तसेच आपल्या कनिष्ठ महाविद्यालयातील एखाद्या विद्यार्थ्याचे प्रमाणपत्र प्राप्त न झालेस दि.06/12/2024 अखेर मंडळ कार्यालयास लेखी पत्राव्दारे कळविण्यात यावे. तद्नंतर प्राप्त तक्रारींचा विचार केला जाणार नाही.
2. सर्व प्रमाणपत्रांवर मा.विभागीय सचिव यांची स्वाक्षरी असल्याची खात्री करावी. त्याचबरोबर प्रमाणपत्रांवरील नोंदी उदा.विद्यार्थ्यांचे नाव/ आईचे नाव/ वडीलांचे नाव/ आडनाव, नावाचे स्पेलिंग व विषय इ. माहिती कनिष्ठ महाविद्यालयाच्या अभिलेखावरुन बिनचूक तपासण्यात याव्यात.
3. प्रमाणपत्रे विद्यार्थ्यांना हस्तपोहोच देण्यापूर्वी प्रमाणपत्राच्या पाठीमागे असलेल्या रकान्यात आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाचा शिक्का तथा प्राचार्य यांची स्वाक्षरी होऊनच प्रमाणपत्र निर्गमित होईल हे कटाक्षाने पहावे. प्रमाणपत्राचा गैरवापर होऊ नये या अनुषंगाणे प्रमाणपत्र प्रत्यक्ष विद्यार्थ्याच्याच हाती जाईल याची दक्षता घ्यावी. प्रमाणपत्र वितरीत केल्यानंतर ते प्राप्त झाल्याबाबत प्रत्येक विद्यार्थ्याची स्वाक्षरी घेऊन सदर स्वाक्षरीची यादी तारखेसह आपल्या दप्तरी अभिलेखाच्या स्वरुपात काळजीपूर्वक जतन करुन ठेवण्यात यावी.
4. प्रमाणपत्रांमध्ये काही त्रूटी असल्यासं दुरुस्तीसाठीचे परिपूर्ण प्रस्ताव दि.26/12/2024 अखेर मंडळ कार्यालयात समक्ष सादर करण्यात यावेत. दुरुस्ती प्रस्तावासोबत खालीलप्रमाणे कागदपत्रे आवश्यक आहेत -
   - अ) प्रती प्रमाणपत्रातील प्रत्येक चूकीच्या नोंदीसाठी रु.200/- आणि नवीन प्रमाणपत्रासाठी रु.200/- असे एकूण रु.400/- शुल्क भरावे लागेल.
   - ब) कनिष्ठ महाविद्यालयाच्या जनरल रजिस्टरमधील संबंधित विद्यार्थ्यांच्या नावाची नोंद असलेल्या पानाची प्राचार्यांनी प्रमाणित केलेली छायांकीत प्रत
   - क) दुरुस्ती यापूर्वीच म्हणजेच प्रिलिस्ट, प्रवेशपत्रे अथवा गुणपत्रिका प्राप्त झाल्यानंतर का कळविली नाही याबाबत संबंधित प्राचार्य व लिपिक यांचा विभागीय सचिव यांच्या नावे वस्तुनिष्ठ खुलासा सादर करावा.

आपल्या कनिष्ठ महाविद्यालयामार्फत प्रमाणपत्र दुरुस्तीचे परिपूर्ण प्रस्ताव विहीत मुदतीत मंडळ कार्यालयास प्राप्त झाल्यानंतरच दुरुस्तीची कार्यवाही केली जाईल. तद्नंतर काही त्रुटी राहील्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाची राहील याची नोंद घ्यावी.

**( सुभाष रा.चौगुले )**
**विभागीय सचिव,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर**